# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping children in distress situation**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **11/12/2021**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन मालेगाव हद्दीत पोलीस व सरकारी कामगार अधिकारी यांचे संयुक्त पथकाने दोन आस्थापना धारक यांचे विरुद्ध बाल कामगार अधिनियम प्रमाणे कार्यवाही केली असून या कारवाही मध्ये दोन बाल कामगारांना पिळवणूक होण्यापासून वाचविण्यात आले आहे. तसेच असे बाल कामगार कामाकरीता ठेऊ नयेत व असे बाल कामगार आढळून आल्यास माहिती देणे बाबत आवाहन करण्यात आले.

## Child labourers rescued in Malegaon

■ **District Correspondent**
WASHIM, Dec 11

ACTIVISTS working under the Child Labour Act raided two establishments at Malegaon and rescued two child labourers.

A raid was organided at Malegaon to put an end to the practice of child labour . During the raid, the task force found two child labourers working at two establishments. The task force rescued both the child labourers and registered a case in Malegaon Police Station against owners of the concerned establishments.

Under the Child Labour Act and Juvenile Labour (Prevention and Regulation) Act, people have been asked to informed a police officer or government labour officer and lodge a complaint if there is a child labour employed in any establishment People should cooperate to eradicate this practice of child labour and no child should be employed, the appeal was made by Labour Officer Gaurao Kumar Nalinde.

**पुण्य नगरी**

## बालकामगार प्रतिबंध कायद्यानुसार दोन प्रतिष्ठानांवर कारवाई

**मालेगाव :** बालकामगार यांचेकडून काम करून घेत असताना वाशीमच्या सरकारी कामगार अधिकारी यांनी धाड टाकून मालेगाव येथील दोन प्रतिष्ठावर १० डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजेदरम्यान कारवाई केली. त्यामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे.

मालेगाव येथील शेलुफाटा नागरतास रस्त्यावर असलेल्या अग्नीहोत्री मोटर्समध्ये एक १६ वर्षीय व संतोष फेब्रीकेशन ॲन्ड भावना अग्रोवर्कस् या दुकानामधे क्रमशः एक १६ वर्षीय आणी एक १७ वर्षीय अल्पवयीन बालक यांचे कडून काम करून घेत असल्याची माहिती मिळाली . त्यावरून सरकार तर्फे सरकारी कामगार अधिकारी गौरवकुमार रमेश नालींदे वाशीम यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह या दोन्ही प्रतिष्ठाणावर १० डिसेंबर रोजी १२ वाजताच्या सुमारास धाड टाकली. त्यावेळी हे दोन्ही बालक तेथे काम करताना आढळले. त्यावरून त्यांनी वरील दोन्ही प्रतिष्ठानाच्या मालकाविरुद्ध बाल कामगार प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम १९८६ चे कलम ३ व सुधारणा २०१६ चे कलम ३ (अ) नुसार कारवाई केली . याबाबत फिर्याद मालेगांव पोलीस स्टेशनला नोंदवण्यात आली असुन पुढील तपास सुरु आहे.

**Smart Bhandara-Gondiya**
Page No.4 December 11, 2021